بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ      نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ      وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in      محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# क्षमा याचना आणि पश्चात्तापाची हकीगत

.$सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २५ ऑगस्ट २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ اَمَّا بَعْدُ فَاَعُوْذُ بِاللّٰہِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔ بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ۔ اَلۡحَمۡدُ لِلّٰہِ رَبِّ الۡعٰلَمِیۡنَ۔ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ۔ مٰلِکِ یَوۡمِ الدِّیۡنِ۔ اِیَّاکَ نَعۡبُدُ وَاِیَّاکَ نَسۡتَعِیۡنُ۔ اِہۡدِنَا الصِّرَاطَ الۡمُسۡتَقِیۡمَ۔ صِرَاطَ الَّذِیۡنَ اَنۡعَمۡتَ عَلَیۡہِمۡ ۬ۙ غَیۡرِ الۡمَغۡضُوۡبِ عَلَیۡہِمۡ وَلَا الضَّآلِّیۡنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहा पठन केल्यानंतर हुजूर अनवर म्हणालेः सर्वशक्तिमान अल्लाह आपल्या भक्तांची क्षमा आणि पश्चात्ताप स्वीकारतो, परंतु ती खरी असावी ही त्यासाठी अट आहे, केवळ मुखातून निघालेले शब्द स्वीकारपद नाहीत. पवित्र कुरआनात विविध ठिकाणी नमूद आहे की अल्लाह पश्चात्ताप करणाऱ्यांना संपत्ती आणि संततीने आशीर्वादित करतो आणि ईश्वरीय शिक्षेपासून सुरक्षित राहण्याचे हे एक साधन आहे.

जो क्षमा मागतो तो अल्लाहची दया ग्रहन करतो. एका ठिकाणी सर्वशक्तिमान अल्लाह क्षमा मागणाऱ्यांना शुभवार्ता देत असे सांगितले आहे की, لَوَجَدُوا اللّٰہَ تَوَّابًا رَّحِیۡمًا ''ते त्याला पुष्कळ क्षमा कबूल करणारा आणि कृपावंत जाणवतील'' पण अट हीच की ती याचना खरी असावी.

एका हदीसमध्ये, हजरत अनस यांच्याकडून असे वर्णन आहे की, मी पवित्र पैगंबर (स.) यांना असे म्हणताना ऐकले की, खरोखर पापांचा पश्चात्ताप करणारा असा आहे जणू त्याने कधीच पाप केले नाही. जेव्हा अल्लाह एखाद्या व्यक्तीवर प्रेम करतो, तेव्हा पाप त्याचे नुकसान करू शकत नाहीत, म्हणजेच, पापाचे हेतू त्याला वाईटाकडे प्रवृत्त करू शकत नाहीत, आणि अल्लाह त्याचे वाईट परिणामांपासून संरक्षण करतो. पवित्र पैगंबर (स.) सांगतात की, लज्जित होणे आणि वाईट वाटणे हे पश्चात्तापाचे प्रतीक आहे. म्हणून, जिथे खरा पश्चात्ताप करणारा पापांपासून मुक्त असतो, तिथे त्याला सर्वशक्तिमान अल्लाहचे प्रेम देखील प्राप्त होते आणि त्याच्या दयेचा पुन्हा पुन्हा पात्र बनतो.

खऱ्या पश्चात्तापाच्या अटींबद्दल, हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की खऱ्या पश्चात्तापाची पहिली अट भ्रष्ट विचार आणि वाईट विचार सोडणे. दुसरी अट खरा पश्चात्ताप आणि लज्जा बाळगणे. तिसरी अट अशी की त्याने त्या गुन्हा जवळही न जाण्याचा निर्धार करावे. आणि एवढ्यावरच थांबू नये, तर चांगली नैतिकता आणि शुद्ध

कृतींनी त्याची जागा घेतली पाहिजे. तर हा खरा पश्चात्ताप आणि खरी क्षमा याचना आहे. जेव्हा ही स्थिती प्राप्त होते, तेव्हा सर्वशक्तिमान अल्लाह त्याच्या सेवकांवर प्रेम करतो. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) वारंवार क्षमा आणि पश्चात्तापाकडे आमचे लक्ष वेधतात. याबाबतीत त्यांना इतकी काळजी होती की अशी कोणतीही संधी नाही जेव्हा त्यांनी याकडे जमाअतचे लक्ष वेधले नाही. म्हणून सर्वशक्तिमान अल्लाह, पवित्र पैगंबर (स.) आणि हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांचे उपदेश नेहमी आपल्यासमोर ठेवणे आणि त्यांचे पालन करणे आवश्यक आहे जेणे करून आम्ही दीक्षाचे हक्क अदा करणारे होवोत.

जर आपण स्वतःमध्ये शुद्ध बदल घडवून आणला नाही आणि खऱ्या पश्चात्तापाकडे आणि क्षमाशीलतेकडे लक्ष दिले नाही, तर स्वतःला सुधारण्याची आपली प्रतिज्ञा आपले काही भले करू शकत नाही. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) सांगतात की, हे स्पष्ट आहे की मनुष्य स्वभावाने अत्यंत दुर्बल आहे आणि सर्वशक्तिमान अल्लाहच्या शेकडो आज्ञांचा भार त्याच्यावर टाकण्यात आला आहे. त्यामुळे त्याच्या स्वभावातच तो काही आज्ञांचे पालन करण्यास असमर्थ आहे आणि कधीकधी भौतिक मोह त्याच्यावर प्रभाव टाकत असते. म्हणून, त्याच्या दुर्बलतेमुळे आणि स्वभावामुळे, त्याला पश्चात्ताप करण्याचा आणि चूक झाल्यावर क्षमा मागण्याचा अधिकार आहे, जेणेकरून देवाची दया त्याला नष्ट होण्यापासून वाचवेल. म्हणून, हे निश्चित आहे की जर परमेश्वर पश्चात्ताप स्वीकारणारा कोणीही नसता तर शेकडो आज्ञांचे ओझे मनुष्यावर कधीच लादले गेले नसते. यावरून हे नि:संशय सिद्ध होते की परमेश्वर पश्चात्ताप स्वीकारणारा आणि क्षमा करणारा आहे आणि तौबा चा अर्थ असा होतो की एक माणूस या घोषणेने दुष्कर्म त्याग करतो की जर ते पुन्हा करण्यास त्याला आगीत टाकले गेले तरी तो त्यास पुन्हा करणार नाही. (अर्थात-मरण त्याला ते करण्यापासून अधिक उचित वाटेल)

ही तौबा आहे जी खरी मानली जाते. म्हणून जेव्हा एखादी व्यक्ती या प्रामाणिकपणाने आणि दृढ निश्चयाने सर्वशक्तिमान ईश्वराकडे वळते, तेव्हा परमेश्वर जो दयाळू आणि कृपाळू आहे, तो या पापाची शिक्षा माफ करतो, आणि परमेश्वराचे सर्वोच्च गुणवैशिष्ट आहे की तो पश्चात्ताप स्वीकारून त्याला पथभ्रष्ट होण्यापासून वाचवतो.

बरेच लोक म्हणतात की आम्ही इतक्या वेळा माफी मागितली, शंभर-हजार तस्बिहांचे पठण केले, पण जेव्हा तुम्ही त्यांना क्षमा मागण्याचा अर्थ विचाराल तेव्हा ते स्तब्ध होतात. माणसाने मनापासून क्षमा मागितली पाहिजे जेणेकरुन त्याच्याहस्ते घडलेल्या पापांची आणि गुन्ह्यांची शिक्षा होऊ नये, त्याला क्षमा मिळावी आणि भविष्यात त्याने नेहमी सर्वशक्तिमान परमेश्वराकडे अंतःकरणातून मदत मागावी. आणि भविष्यात चांगली कृत्ये करण्याची आणि पापांपासून आपले संरक्षण करण्याची प्रार्थना करावी. शब्दांनी काहीही लाभ होणार नाही. आपण आपल्या भाषेत क्षमा मागू शकतो की सर्वशक्तिमान अल्लाह माझे पाप क्षमा कर आणि भविष्यातील पापांपासून माझे रक्षण कर आणि सत्कर्म

करण्याची संधी प्रदान कर. हीच खरी क्षमा आहे. परमेश्वरापर्यंत तीच याचना पोहचते जी हृदयातून येते; जिभेतून निघालेली प्रार्थना ही केवळ हृदयाचा पुरावा देते. केवळ तोंडी प्रार्थना व्यर्थ आहे.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की जमाअतमध्ये इतरांपेक्षा एक विलक्षण गुण असावे. जर एखादी व्यक्ती दीक्षा घेतल्यानंतर कोणतेही विलक्षित गुण सादर करत नाही आणि आपल्या कुटुंबाशी आणि नातलाग व अपत्यांशी पहिलेसारखे वागतो तर त्याचे हे सर्व कार्य आणि दीक्षा निरर्थक आहे. गैरवर्तन आणि वाईट वागणूक कायम राहिली आणि परिस्थिती पूर्वीसारखीच राहिली, मग निष्ठेची प्रतिज्ञा करण्यात काय अर्थ आहे? दीक्षा घेतल्यानंतर त्याने अनोळखी लोकांसमोर आणि त्याच्या नातेवाईकांना आणि शेजाऱ्यांसमोरही एक उदाहरण ठेवले पाहिजे, जेणेकरून ते म्हणतील की तो आता पूर्णपणे बदलला आहे तसा राहिला नाही जसा तो होता. आणि क्षमा याचनाचे हेच खरे परिणाम असावे.

काही अज्ञानी पादरी (ख्रिस्ती धर्मोपदेशक) पवित्र प्रेषित (स.) वर आक्षेप घेतात की, पवित्र पैगंबर क्षमा मागत होते म्हणजे त्यांनी गुन्हा केले असेल (अल्लाह क्षमा करो). या अडाणी लोकांना हे माहित नाही की क्षमा हा एक उच्च गुण आहे. मनुष्य नैसर्गिकरित्या अशा प्रकारे बनलेला आहे की दुर्बलता आणि अशक्तपणा ही त्याची नैसर्गिक शैली आहे. पैगंबरांना या नैसर्गिक दुर्बलतेची आणि मानवीय अशक्तपणाची भान असते, म्हणून ते प्रार्थना करतात की, हे अल्लाह, त्या मानवी दुर्बलता प्रकट होण्यापासून आमचे रक्षण करा.

मी माझ्या स्वतःच्या सामर्थ्याने पाप टाळू शकतो असा दावा कोणीही करू शकत नाही. आणि पैगंबरांनाही रक्षणासाठी देवाची गरज असते. म्हणूनच, उपासनेच्या प्रकटीकरण करण्यासाठी पवित्र पैगंबर (स.) इतर पैगंबरांप्रमाणे सर्वशक्तिमान परमेश्वराकडे त्यांच्या संरक्षणाची मागणी करत असत.

येशूने क्षमा याचना केली नाही, हा ख्रिस्तीलोकांचा चूकीचा विचार आहे. बायबलमधून हे स्पष्ट होते की त्यांनी आपल्या कमकुवतपणाची कबुली केली आणि क्षमा मागितली. म्हणालेः बरं, मला सांगा ایلی ایلی لما سبقتانی याचा अर्थ काय आहे? ابی ابی म्हणून का संबोधले नाही? इब्रानी मध्ये इली परमेश्वरासाठी वापरले जाणारे शब्द आहे. याचे अर्थ दया आणि कृपा कर आणि मला अशा अवस्थेत सोडू नको, म्हणजेच माझे रक्षण कर, हेच अभिप्रेत होते.

हदीसमध्ये असा उल्लेख आहे की जर एखादी व्यक्ती देवाकडे एक पाऊल जाते, तर देव त्याच्याकडे दोन पाऊल येतो, आणि जर मनुष्य त्याच्याकडे चालत जातो तर तो त्याला प्रतिसाद देत धावत येतो. अर्थात जर मनुष्य परमेश्वराकडे आपले लक्ष वेधले तर तो त्याला प्रतिसाद देत अपार दया व कृपाने अवतरित होतो आणि जो त्याच्यापासून दृष्टीआड

करतो तर मग परमेश्वराला आमच्यापासून काय गरज. पवित्र कुरआनात सर्वशक्तिमान अल्लाहची दोन नावे दिली आहेत. الحيّ-القيّوم, अल-हैय म्हणजे ईश्वर जिवंत आहे आणि इतरांना जीवन प्रदान करतो आणि अल-कय्युम हा स्वयं-स्थापित आणि इतरांच्या अस्तित्वाचे मुख्य कारण आहे. प्रत्येक वस्तूचे बाह्य, अंतर्गत अस्तित्व आणि जीवन या दोन गुणधर्मांमुळे आहे. म्हणून हैय याचे गुण असे की त्याची उपासना केली जावी आणि त्याचा प्रकटीकरण सुरह फातिहा च्या या शब्दातून प्रदर्शित होतो की, إِيَّاكَ نَعْبُدُ आणि अल-कय्युमद्वारे आम्ही त्याची सहाय्यता मागतो जसे की, إِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. माणसाला प्रत्येक परिस्थितीत देवाची गरज असते. म्हणूनच देवाकडे शक्ती मागणे आवश्यक आहे आणि हीच खरी क्षमा आहे.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, उपासना आणि सत्कर्मासाठी एक स्वाद आणि आनंद स्वतःकडून निर्माण होत नाही तर तो परमेश्वराच्या कृपावर आधारित आहे. म्हणून माणसाने न घाबरता सदैव त्याची कृपा व दया मागावी. उपासनेत तल्लीन होण्याची प्रार्थना देखील परमेश्वराला करा आणि हे मागताना थांबणे किंवा थकून जाणे दुरुस्त नाही.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणाले, ''लक्षात ठेवा की अल्लाहशिवाय औषध आणि सल्ल्यावर अवलंबून राहणे मूर्खपणा आहे. तुमच्या जीवनात असा बदल घडवा की तुम्हाला कळेल की नवीन जीवन म्हणजे क्षमा याचनाचेच जीवन आहे. खूप क्षमा याचना करा. व्यस्त जगामुळे ज्यांना मोकळा वेळ कमी मिळतो त्यांना सर्वात जास्त भीती वाटली पाहिजे. नोकरी करणारे लोक अनेकदा देवाची कर्तव्ये चुकवतात. त्यामुळे मजबूरीमध्ये जुहर, असर आणि मगरीब आणि ईशाच्या नमाज एकत्र करणे वैध आहे. जर अत्यंत मजबूरी असली तर जमा करण्यात हरकत नाही पण ठराविक वेळेवर अदा करणे जास्त वैध आणि रास्त आहे. निर्माता आणि निर्मिती दोहोंच्या हक्कांची पूर्ती करण्यात गफलत करू नका. आणि तुमचे कर्तव्ये एकनिष्ठपणे अदा करा.

त्यामुळे मूळ आदेश समोर ठेवून त्याचे योग्य पालन केले तरच क्षमा आणि पश्चात्ताप फायदेशीर ठरतो. नमाज अदा करण्यात नियमितता असली पाहिजे, अल्लाहचे हक्क आणि सेवकांचे हक्कही योग्य पद्धतीने अदा केले पाहिजेत.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात: पश्चात्ताप स्वीकारला जात नाही असे म्हणू नका. लक्षात ठेवा की तुम्ही तुमच्या कृतीतून कधीच सुटू शकत नाही. तुम्हाला नेहमी कृपा वाचवते, कृती नाही. परत म्हणाले: हे परम दयाळू व असीम कृपाळू परमेश्वरा! आम्हा सर्वांवर दया करा की आम्ही तुझे उपासक आहोत आणि तुझ्या आश्रयाला पडलो आहोत. सर्वशक्तिमान अल्लाह आम्हाला हजरत अपेक्षित मसीहांच्या प्रार्थनांचे वारस

बनवो. आणि आम्ही पश्चात्ताप आणि क्षमा याचनाचे अस्सल अर्थ समजता त्यानुसार जीवन जगणारे होवो. आमीन.

प्रवचनाच्या शेवटी, हुजूर अनवर यांनी ४ मृतकांचे आणि त्यांच्या सेवांचा उल्लेख केला आणि त्यांची नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَن یَّھْدِہِ اللّٰہُ فَلاَ مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلاَ ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ أَنْ لَّآ اِلٰہَ اِلاَّ اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ،
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔